**कृपया प्रसिध्दीसाठी** **21 मार्च 2011**

**गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई थांबवा**

**पेट्रोलियम मंत्र्यांना राम नाईक यांचे आवाहन**

**मुंबई, सोमवार :** देशभर निर्माण केलेली गॅस सिलेंडरांची कृत्रिम टंचाई बंद करुन सिलेंडरांच्या काळ्या बाजाराला आळा घाला, असे आवाहन माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी गेल्या आठवड्यात शुक्रवारी विद्यमान पेट्रोलियम मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांची भेट घेऊन केले. यावेळी भाजपा उत्तर पश्चिम मुंबई जिल्ह्याचे माजी अध्यक्ष श्री. सुमंत घैसास हेही त्यांच्यासोबत होते. तसेच पेट्रोलियम खात्याचे सचिव श्री. एस. सुंदरेशन व संयुक्त सचिव श्री. अपूर्व चंद्र हेही उपस्थित होते.

देशभर सिलेंडरांची कृत्रिम टंचाईने परिसीमा गाठली आहे. गोरगरीब आणि दुर्गम पहाडी भागातील जनतेसाठी वाजपेयी सरकारने आणलेला 5 किलोंचा सिलेंडर तर आता घरगुती वापरासाठी मिळतच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अन्य सिलेंडरांचीही कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना महिन्याभरापेक्षा अधिक काळ सिलेंडरची वाट पाहावी लागत आहे आणि सर्वत्र सिलेंडरांचा काळाबाजार सुरु आहे, तो तात्काळ थांबवावा असे आवाहन श्री. नाईक यांनी श्री. जयपाल रेड्डी यांना केले. यावेळी बोलताना श्री. नाईक म्हणाले, "14.2 किलोंच्या घरगुती ग्राहकांसाठीचा सिलेंडरचा दर रु. 348.45 म्हणजेच प्रति किलो रु. 24.54 एवढा आहे. या दराने पाच किलोंचा सिलेंडर गरीब घरगुती ग्राहकांना अवघ्या रु. 122.70 नां मिळाला असता. परंतु गेले काही महिने तो बाजारातून गायबच करण्यात आला आहे. मुंबईतील गरीब ग्राहकांना आणि दुर्गम, पहाडी विभागातील ग्राहकांना याची झळ बसली आहे. आता फक्त व्यापारी दराने म्हणजेच रु. 362.47 भावाने पाच किलोंचा सिलेंडर मिळतो. म्हणजेच तो 14.2 किलोच्या सिलेंडरपेक्षाही महाग असताना तो कोण घेईल ?" पहाडी विभागातील ग्राहकांना एवढा मोठा सिलेंडर उचलून डोंगरावर चढणे कठिण जाते तसेच त्यांची आर्थिक क्षमताही मोठ्या सिलेंडरचे पैसे एकाच वेळी देण्याची नसते म्हणून श्री. राम नाईक यांनी पेट्रोलियम मंत्री असताना 5 किलोचे सिलेंडर घरगुती वापरासाठी सुरु केले होते.

पाच किलोचे सिलेंडर गायब झाले आहेत एवढेच नव्हे तर 14.2 किलोंच्या सिलेंडरची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून त्यामुळे सिलेंडर मिळण्यास अनेक ठिकाणी एका महिन्यापेक्षा अधिक काळ लागत आहे. वाजपेयी सरकारच्या काळात जर आम्ही 24 तासात सिलेंडर कोणताही ज्यादा आकार न घेता देऊ शकत होतो तर आता असे काय झाले ज्यामुळे हा विलंब लागतो आहे याची गांभीर्याने चौकशी करावी, असे आवाहन श्री. नाईक यांनी श्री. जयपाल रेड्डी यांना करुन यामुळेच देशभर सर्वत्र काळाबाजार सुरु असल्याचे निदर्शनास आणून दिले. श्री. जयपाल रेड्डी यांनी या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

**(कार्यालय सचिव)**